# लिंगायत साहित्याची उद्गाते - महात्मा बसवण्णा

**डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे,**
विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर.

प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन १२ व्या शतकातील लिंगायत तत्वज्ञान व साहित्याचे उद्गाते महात्मा बसवण्णाच आहेत हे शरण साहित्य व त्यानंतरच्या साहित्यातुन कसे स्पष्ट होते हे सांगण्याच्या हेतुने केले. संपुर्ण जगाने महात्मा बसवण्णाच लिंगायत साहित्याचे उद्गाते आहेत हे मान्य करुनही भारतात मात्र महात्मा बसवण्णाच लिंगायत साहित्याचे उद्गाते आहेत हे वारंवार सांगावे लागते. कारण भारतात बसवण्णाप्रती उदासिनता व समाजाची त्यांना समजुन व जाणुन घेण्याबाबतची अनासक्ती कारणीभुत आहेत.

महात्मा बसवण्णांनी समाजातील १८ पगड जातीतील लोकांना संघटीत व शिक्षीत करुन १२ व्या शतकात लिंगायत तत्वज्ञानाची निर्मिती केली. ज्याचा प्रकाश सबंध भारतभर पसरला. परिणामत: अनेक लोक संघटीत होवुन लिंगायत तत्वज्ञानाची निर्मिती करण्यात १२ व्या शतकापासुन ते २१ व्या शतकापर्यंत आपले योगदान देत आहेत. लिंगायत साहित्यातील एक महनीय व्यक्ती म्हणजे महात्मा बसवण्णा होय. नऊसे वर्षापुर्वीच्या इतिहासातील अनेक साहित्यकांच्या लेखनाचा प्रारंभ ओम श्री गुरु बसवलिंगाय नम: असा होतो. कन्नड साहित्याप्रमाणेच इतर अनेक साहित्यकांनीही १२ व्या शतकापासुन पुढे त्याच पध्दतीचा अवलंब केल्याचे स्पष्ट होते. १२ व्या शतकात महात्मा बसवण्णांनी जनसामान्यांची मने व्यापली होती. त्याकाळातील अनेक शरण आणि शरणींनी लिखानाच्या आरंभी व शेवटी बसवण्णांनाच प्रमाण मानले.

अशा रीतीने प्रारंभीची स्तुती सोडली तरी, वेगळया रीतीनेही स्वतंत्रपणे बसव स्तुती केली आहे. ही प्रक्रिया समकालीन शरणांच्या वचनांपासून सुरु असल्याचे दिसून येते. एका अभ्यासानुसार एक हजार वचनांत बसवण्णांची स्तुती दिसून येते. कल्याणरुपी पणतीस भक्तिरसरुपी तेल ओतुनी, सदाचाराच्या वातीस स्पर्शिता बसवण्णारुपी ज्योती, झगमगतो हो शिवप्रकाश | मृत्युलोक शिवलोकीचे सोपान झाले, देवा , तुम्ही कल्याणास आल्याकारणे. अशी अनेक अर्थपूर्ण वचने बसवण्णांच्या अवताराची सार्थकता बाहू उंचावून सांगतात. एवढेच नाही तर, समकालीन सिध्दरामांनी बसव स्तोत्र त्रिविधी नावाची स्वतंत्र कृती लिहीली. याचे अनुसरण करीत पुढील काळात अनेकांनी बसवस्तोत्र या नावाने अनेक वचने तयार केली. याही पुढे जाऊन बसवकंद, बसव तारावळी, बसव पवाड रगळे, बसव नामावली, बसव शतक, बसवाष्टक, बसवेश्वर एकशे आठ नाम, बसवेश्वर सहस्त्र नामावली इत्यादी नावांनी रचना झाल्या आहेत. याशिवाय बसवण्णांच्या वचनांना, त्यांच्याविषयीच्या कृतींना टीका, कथसागर इत्यादी प्रकारांत लेखन झाले आहे. बसवणांची वचने षटस्थल क्रमातच सापडतात. ही कृती कन्नडमध्ये खूप प्रसिध्द झाल्यामुळे अनेकांनी त्यावर भाष्य केले.

बसवणांविषयीच्या अनेक कृतींना अनेक अर्थ व तात्पर्य आहेत. भीमकवीच्या बसव पुराणावर आधारित उत्तर देशीचे बसवलिंग यांनी बसवेश्वरदेवर पुराणद कथासागर नावाची कृती रचली. षडक्षरदेवाच्या वृषभेंद्रविलास या कृतीस एका अनामिकाने विवरण लिहिले. आणखी एका अनामिकाने वृषभेंद्र विजय पुराणद ललित पदवृत्त नांद्य नावाचा संग्रह केला आहे. अशा स्तोत्रादी लघुकृती, टीका, व्याख्यान असलेल्या विवरणात्मक कृती सोडल्या तर, बसवणांविषयी रगळे, षटपदी, सांगत्य, त्रिपदी, चंपू, यक्षगान इत्यादी साहित्य प्रकारांत विपुल ग्रंथरचना झाली आहे. प्रत्यक्ष बसवण्णांविषयी लिहिलेल्या कृतींत तर ते सर्वव्याप्त आहेतच परंतु अन्य कोणाच्याही विषयी लिहिलेल्या कृतींतसुध्दा बसवण्णांची अनिवार्यता आहे. लिंगायत परंपरेत बसवण्णांविषयी बसवण्णांशी निगडीत भीमकवी, सिंगिराज, हरिहर या तीन कथापरंपरांत असंख्य कृती निर्माणा झाल्या आहेत. भीमकवीने चरित्रास पुराणचे आवरण चढविले आहे. तर सिंगिराजाने बसवण्णांच्या व्यक्तिमत्वास आणि हरिहराने समष्टिकेंद्रित व्यक्तित्वास अधिक महत्व दिले. यापैकी हरिहराची परंपरा पुढे खंडित झाली. सिंगिरांजाची परंपरा लक्कण्णा दंडेश त्यांच्यानंतर थांबली. भीमकवीची परंपरा मात्र बसवेश्वर काव्य (गरणी बसवलिंग-सांगत्य), भक्तिरस (मचय्या-सांगत्य) वृषभेंद्रविजय (षडक्षरी-चंपू) इत्यादी काव्यास आदिमूल

झाली आहे. काव्याव्यतिरिक्त यक्षगान सारख्या खुल्या मैदानात (लघुनाटय) करावयाच्या कृतीही बसवण्णांविषयी निर्माण झाल्या आहेत.

बसवण्णांशिवाय अन्य शरणांविषयी लिहिलेल्य कृतींतही बसवण्णांचा गाढ प्रभाव जाणवतो. त्यात त्यांची अनिवार्यता उठून दिसते. बसवाने केल्याने झाले गुरुस्थान, बसवाने केल्याने झाले लिंग, बसवाने केलयाने झाले जंगम अशा उक्तिव्दारे त्यांनी दिलेल्या अमूल्य देणगीचे स्मरण केले आहे. असाच आणखी एक ग्रंथ म्हणजे चेन्नबसव पुराण, या ग्रंथातही अधूनमधून बसवण्णांविषयी उल्लेख करुन समग्र चरित्र उकलले. नीलकंठाचार्यांच्या आरध्य चरित्रातील दीक्षा प्रकरणात, शिवयोग निद्रा,महिम प्रकरणातील १० व्या अध्ययात, बसवेश्वरांविषयी पंडिताराध्यांचा प्रलाप चित्रित झाला आहे. सिध्दनंजेशाच्या गुरुराज चरित्रातील ८ व्या अध्ययात बसवण्णाचे चरित्र आले आहे. अशा प्रकारे याविषयी अनेक चरित्रात्मक साहित्यकृती कन्नडमध्ये निर्माण झाल्या आहेत.

वरील शरण चरित्र केंद्रित शरण समुहाचे नायक असलेल्या बसवण्णांची कथा येणे अनिवार्य आहे. पंरतु शिवतत्व चिंतामणी, वीरशैवामृत महापुराण यासारख्या तात्विक कृतीतही बसवण्णा प्राधान्याने दिसून येतात. एकूण वरील सर्व लिखाणाचा विचार करता बसव चरित्रास अधिकाधिक भाग सर्मपित केल्याचे दिसून येते. कन्नड सहित्यात चतुराचार्यांचा उल्लेख असलेली पाहिली कृती म्हणजे वीरशैवामृत महापुराण यातील शिवाचीलीला, शिवतत्व,शिवशरणांचे चरित्र यात चतुराचार्यांचा उल्लेख मोजक्या पद्यातच संपला आहे. तसेच, बसवण्णांचे चरित्र व्यापले आहे. पुढे जाऊन पूर्वाचारी बसवण्णा षट्स्थलद निर्णयवट्टवं बसवनल्लदिन्नारु मगने इत्यादी महत्वपुर्ण उल्लेख केले आहेत. एकोत्तर षटस्थल सिध्दान्त हा रेणुकाने अगस्तीस उपदेशिला असा प्रचार आज करण्यात येत आहे.

या संदर्भात सांगायचे म्हणजे, बसवण्णांना चतुराचार्य परंपरेनेही विशेष स्थान दिले अहे. बाळेहळळी पीठाचे कुमार चेन्नबसव यांनी बसवेश्वर पुराणातील गुप्त म्हटले गेलेल्या पुरातनांचे चरित्र लिहिण्याव्दारे तोपर्यंत ही पंरपरा बसवनिष्ठ होती असे सूचित केले आहे. या आणखी पुष्टी असल्याप्रमाणे तो स्वतः शशिधरार्चक जनके बसवेशनंददि असल्याचे अभिमानाने सांगितले आहे. पंचाचार्य परंपरेच्या हुलिय सिध्दनंजेश यांनी बसव शतक नावाची कृती रचून त्यात बसवण्णांपेक्षा अधिक श्रेष्ठ दुसरे दैवत नाही असे म्हणत बसवणांविषयी अपार आदर व्यक्त केला आहे. १७ व्या शतकातील षडक्षरदेव चतुराचार्य परंपरेतील असले तरी, वृषभेंद्र विजयम् नावाचे महाकाव्य त्यांनी लिहिले. यावरुन यातील सामरस्याची महोन्नतता दिसून येते.

नंदी आगमलीले बसव चरित्राविषयीचा एक विशिष्ट ग्रंथ होय. हरिहर, पाल्कुरिके सोमनाथ, सिंगिराज या परंपरेपेक्षा भिन्न परंपरेची ही कृती आहे. ती विजयनगर कृष्णदेवरायाचा समकालीन कोडकल्ल बसवण्णाचा पणतू वरीसंगय्या याने लिहिला आहे. त्याचा मुख्य उद्देश आपला पुर्वज कोंडेकल्ल बसवण्णांचे चरित्र लिहिणे हा होता.

आज महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक मठाधीश , साहित्यीक, संशोधक व नवअभ्यासक बसवण्णाच लिंगायत तत्वज्ञानाचे निर्माते असल्याचे संशोधनाअंती सांगत आहेत. लिंगायत समाज बांधवाने व नवतरुणाने या संशोधनाचे अध्ययन करणे गरजेचे आहे. महात्मा बसवण्णा निर्मित लिंगायत तत्वज्ञान समजुन घेतल्याने अनेक सामाजिक प्रश्न दुर होतील. तसेच भारतीय संविधानातील समताधिष्ठीत समाज व आदर्श नागरिक निर्माण होईल. लिंगायत समाज बांधवाच्या समस्या नष्ट करण्याचा बसवणा निर्मिती लिंगायत तत्वज्ञान हे एकमेव उपाय आहे असे आपल्याला म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१. बसवेश्वर ॲन्ड हिज टाईम्स , डॉ.पी.बी.देशाई
२. आद्य समाज सुधारक, महात्म बसवेश्वर , डॉ.अशोक मेनकुदळे
३. परिवर्तनाचा महामेरु, महात्मा बसवण्णा, डॉ.सचिदानंद बिच्चेवार